साप्ताहिक
''एकच ध्येय... एकच आवाज''
PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक १६ वा | सोमवार, दि. ०४/०५/२०२६ ते दि. १०/०५/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## नूतन व्यापारी संकुलामुळे व्यावसायिक प्रगतीला चालना मिळणार–पालकमंत्री जयकुमार रावल

## पाचकंदील येथील लालबहादूर शास्त्री भाजी मार्केटचा भूमिपूजन सोहळा संपन्न

धुळे (जिमाका) – पाच कंदील परिसरात नव्याने साकारण्यात येणाऱ्या व्यापारी संकुलामुळे शहराच्या व्यावसायिक प्रगतीला चालना मिळेल, असा विश्वास राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.

धुळे शहरातील पाचकंदील भागातील लालबहादूर शास्त्री मार्केटचे भूमिपूजन आज पालकमंत्री श्री. रावल यांच्या हस्ते आज करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास महापौर मायादेवी परदेशी, आमदार अनुपभैय्या अग्रवाल, आमदार राघवेंद्र पाटील, महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस, माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, उपमहापौर ज्योत्सना पाटील, धुळे मनपा सभापती लताबाई पोतदार, लोकप्रतिनिधी, व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, पाचकंदील परिसरातील हे मार्केट हे १०० वर्षे जुने झाले होते. त्यामुळे काळानुसार आपल्याला बदलणे गरजेचे आहे. पाचकंदील चौकात जय जवान, जय किसानचा नारा देणारे लालबहादूर शास्त्री यांच्या नावाने सुसज्ज शॉपिंग कॉम्प्लेक्स व भाजी मंडई तयार केली जात आहे. येथील सर्व व्यापारी व विक्रेत्यांना येथे ओटे व दुकाने मिळणार आहेत. ई-लिलावाच्या माध्यमातून बेरोजगार युवकांनाही येथे दुकाने मिळतील. वर्षभरात हे काम पूर्णत्वास येईल. अतिशय सुसज्ज असे मार्केट येथे तयार होणार आहे.

मुलांच्या उज्वल भविष्यासाठी आजच रोपांची लागवड करून त्यांचे संवर्धन करावे. शहरांचा विकास करताना हरित विकासालाही प्राधान्य देणे आवश्यक आहे. एमआयडीसी फेज-२ साठी सातत्याने प्रयत्न सुरू असून येथे लॉजिस्टिक हब, रेल्वे व हायवे सुविधा विकसित करण्याचे नियोजन आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक व रोजगार निर्मिती होणार आहे. येत्या काळात धुळे महोत्सव सुरू करण्याचा मानस असून शहराच्या सांस्कृतिक विकासालाही चालना दिली जाणार आहे.

विकासाची कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण होतील, मात्र कोणालाही वंचित ठेवले जाणार नाही. धुळे शहरात सुमारे ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी महापौर व नगरसेवकांच्या कामाचे कौतुक करत, अल्पावधीत सुरू केलेल्या विकासकामांच्या गतीबद्दल अभिनंदन केले. यावेळी महापौर श्रीमती परदेशी व आमदार श्री. अग्रवाल यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक महानगरपालिका आयुक्त श्री. कापडणीस यांनी केले.

## जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केली स्व - गणना

## धुळे जिल्ह्यातील नागरिकांना जनगणना करुन घेण्याचे आवाहन

धुळे (जिमाका) – जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी स्व गणनेची प्रक्रिया पूर्ण केली. केंद्र सरकारतर्फे १६ व्या जनगणनेला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र दिनापासून राज्यात पहिल्या टप्प्यात स्व गणनेच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. १५ मे, २०२६ पर्यंत ही मोहीम सुरू राहणार आहे. पहिल्या टप्प्यात नागरिकांनी स्व गणना करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी त्यांच्या शासकीय निवासस्थानी स्व गणनेचा ऑनलाईन अर्ज भरुन दिला. यावेळी महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त सागर जकातदार, डॉ. आशुतोष वसईकर, महानगरपालिकेचे जनगणना विभागप्रमुख रविकिरण पाटकरी, प्रगणना अधिकारी विनोद अजबे आदी उपस्थित होते. तसेच जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील एक भाग स्व-गणना कार्यक्रम सुरु झालेला आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोबाईल किंवा संगणकावर स्व- गणना करुन घ्यावी. सर्व अधिकारी/कर्मचारी



यांनी स्व-गणना करून घ्यावी. त्याचा अहवाल सादर करावा. तसेच जिल्हा स्व-गणनेत राज्यात अग्रेसर राहण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना ही जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केली आहे.

जिल्ह्यातील विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व अधिनस्त कार्यालयांनी se.census. gov. in या संकेतस्थळाचा वापर करुन/ लॉगिन करुन सर्व कार्यालय प्रमुखांसह/कर्मचाऱ्यांनी त्यांच्या सह त्यांच्या कुटुंबाची स्वतःची गणना स्वतःकरुन राष्ट्रीय कामात १०० टक्के सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे.

## मुकेश पटेल सैनिकी शाळेचा १२ वी चा १०० टक्के निकाल

शिरपूर – श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेश आर.पटेल सैनिकी शाळेचा १२ वी चा निकाल १०० टक्के लागला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ महाराष्ट्र राज्य एच.एस.सी. बोर्ड परीक्षेमध्ये शाळेतील एकूण २३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी एकूण सर्वच विद्यार्थी विशेष प्राविण्य प्राप्त करून उत्तीर्ण झाले आहेत. त्याचबरोबर एकूण ९ विद्यार्थ्यांना ९० व त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त झाले आहेत. स्नेहल पुरुषोत्तम चव्हाण ९४ टक्के गुण व मयुरी धनराज भोले ९४ टक्के गुण प्राप्त करत प्रथम, वैष्णवी बाळू गुजर ९२.८० द्वितीय, रोहित मुकेश महाजन ९१.८० तृतीय, सिमोन मनीष क्षीरसागर ९१.३० चतुर्थ क्रमांक, वैष्णव दिनेश चौधरी ९१.२० टक्के पाचवा क्रमांक, मयंक राजेंद्र पानपाटील ९१.२० टक्के गुण पाचवा क्रमांक, ऐश्वर्या देवेंद्र अहिरराव ९०.८० सहावा क्रमांक, अजित गिरीश कासार ९० टक्के गुण प्राप्त करून सातवा क्रमांक प्राप्त करून उत्तीर्ण झाले आहेत.

## नगावबारी-फॉरेस्ट कॉलनी ४० फुटी रस्त्याचे भूमिपूजन; ४० वर्षांची प्रतीक्षा संपणार








धुळे – शहरातील नगावबारी ते फॉरेस्ट कॉलनी दरम्यानच्या ४० फुटी रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन दोन दोन मे रोजी आमदार अनुप भैय्या अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. गेल्या सुमारे ४० वर्षांपासून या रस्त्याचे काम प्रलंबित होते. दरम्यान पाच वेळा भूमिपूजन होऊनही प्रत्यक्ष काम सुरू झाले नव्हते. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी होती. यावेळी बोलताना आमदार अग्रवाल यांनी सांगितले की, विधानसभा निवडणुकीत दिलेल्या शब्दानुसार या रस्त्याचे काम आता प्रत्यक्षात सुरु करण्यात येत आहे. येत्या चार ते पाच महिन्यात काम पूर्ण करण्याचा मानस असून उद्यापासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

रस्त्याच्या काँक्रिटीकरणापूर्वी या ठिकाणी बॉक्स पद्धतीचे गटार बांधण्यात येणार आहे. नगावबारी हा उंच टेकडीचा भाग असल्याने पावसाचे पाणी थेट फॉरेस्ट कॉलनीकडे वाहते आणि निचऱ्याची व्यवस्था नसल्यामुळे परिसरात पाणी साचण्याची समस्या निर्माण होते. बॉक्स गटर झाल्यानंतर पावसाचे पाणी थेट नाल्यात वळवले जाईल आणि पाणी तुंबण्याची समस्या सुमारे ९० टक्के कमी होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या कामासाठी भाजप कार्यकर्ते अमोल मराठे व अमोल सूर्यवंशी यांनी सातत्याने पाठपुरावा केला. रस्ता पूर्ण झाल्यानंतर नगावबारी, फॉरेस्ट कॉलनीसह सुमारे ५० कॉलनींतील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

आमदार अग्रवाल यांनी पुढे सांगितले की, या भागातील सुमारे ८० टक्के रस्ते पूर्ण झाले असून हा एक महत्त्वाचा रस्ता उर्वरित होता. तसेच, कोणाचेही घर पाडले जाणार नाही; मात्र रस्त्यात येणारे अनधिकृत बांधकामाचा पुढे आलेला भाग काढावा लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

नगावबारी परिसरातील घरांसाठी सिटी सर्वे प्रक्रिया सुरू असून साडेपाचशे घरांपैकी सुमारे १४० घरांचे उतारे तयार झाले आहेत. उर्वरित नागरिकांनी कागदपत्रे उशिरा दिल्यामुळे थोडा विलंब होत आहे. तयार झालेले सिटी सर्वे उतारे याच महिन्यात वितरित करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. कार्यक्रमाला भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, महापौर मायादेवी परदेशी, (पान ४ वर)

# संगीतकार व समाजसुधारक रवींद्रनाथ टागोर



रवींद्रनाथ टागोर (बंगाली : उच्चार: रोबीन्द्रनाथ ठाकूर) (मे ७, १८६१ – ऑगस्ट ७, १९४१), ज्यांना गुरुदेव असे ही संबोधले जाते, हे एक ब्राह्मोपंथीय, चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगीतकार आणि समाजसुधारक होते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी यांच्या कार्यामुळे बंगाली साहित्य व संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. अतिशय लोकप्रिय कविता असलेल्या गीतांजलीचे ते कवी होते, ज्याचे वर्णन अगदी संवेदनशील, ताजे आणि सुंदर कविता असे केले जाते. ते १९१३ मध्ये नोबेल पारितोषिक जिंकणारे जगातील पहिले गैर–युरोपियन आणि साहित्यातील पहिले गीतकार बनले. टागोरांच्या काव्यात्मक गाण्यांकडे आध्यात्मिक आणि पारंपारिक म्हणून पाहिले गेले; तथापि, त्यांचे सुंदर गद्य आणि जादुई कविता बंगालबाहेर फारसे ज्ञात नाहीत. बंगाली साहित्यावर रवीन्द्रनाथांचा एवढा प्रभाव लक्षात आहे की, बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रवींद्रोत्तर अशी विभागणी करण्यात येते. त्यांना कधीकधी बंगालचा बार्ड म्हणून संबोधले जाते. तसेच ते अत्यंत प्रतिष्ठित रॉयल एशियाटिक सोसायटीचे सदस्य होते. कोलकात्याच्या पिराली ब्राह्मण कुटुंबात जन्म झालेल्या रवीन्द्रनाथांनी वयाच्या ८व्या वर्षी पहिली कविता लिहिली. वयाच्या १६व्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपणनावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. १८७७ पर्यंत त्यांनी त्यांच्या खऱ्या नावाने लघुकथा आणि नाटके प्रकाशित केली. एक मानवतावादी, सार्वभौमवादी, आंतरराष्ट्रीयवादी म्हणून त्यांनी ब्रिटिश राजवटीचा विरोध केला. शांतिनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होते. पारंपरिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला.

रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांग्लादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे पृथ्वीवरील एकमेव कवी आहेत. श्रीलंकेचे राष्ट्रगीतही त्यांच्या साहित्यातून प्रेरणा घेऊन तयार झाले.

कोलकात्याच्या जोराशंका ठाकूर बाडी येथे रवींद्रनाथ टागोर (टोपणनाव रवि) यांचा जन्म झाला. वडील देवेन्द्रनाथ टागोर (१८१७–१९०५) व आई शारदा देवी (१८३० – १८७५) यांच्या १४ अपत्यांमध्ये रवींद्रनाथ हे १३वे होत.: ११व्या वर्षी मुंज झाल्यावर रवींद्रनाथांनी वडिलांसोबत १४ फेब्रुवारी १८७३ रोजी भारतभ्रमणार्थ कलकत्ता सोडले. या भ्रमंतीत त्यांनी विविध ठिकाणे पाहिली. वडिलांची शांतिनिकेतन येथील मालमत्ता (येथे आता आजचे विश्वभारती विद्यापीठ आहे), अमृतसर व हिमालयातील थंड हवेचे ठिकाण डलहौसी इत्यादी. येथे रवींद्रनाथांनी विविध व्यक्तींची आत्मचरित्रे वाचली, इतिहास, खगोलशास्त्र, विज्ञान , कालिदासाचे काव्य व संस्कृत आदींचे अध्ययन केले.

१८७७ साली प्रकाशित झालेल्या रचनांमुळे रवींद्रनाथ प्रथम लोकांसमोर आले. यात मैथिली कवीच्या विद्यापतीप्रवर्तित शैलीत रचलेल्या काही दीर्घ कविता होत्या. विनोदाने रवींद्रनाथांनी प्रथम ह्या भानुसिंह नामक वैष्णव कवीने १७व्या शतकात रचलेल्या व नंतर गहाळ झालेल्या रचना आहेत, असा आविर्भाव केला व नंतर त्यांचे कवित्व मान्य केले. याच काळात त्यांनी संध्या–संगीत(१८८२), बंगाली भाषेतील पहिली लघुकथा भिकारिणी व सुप्रसिद्ध कविता निर्झरेर स्वप्नभंग आदी रचना लिहिल्या.

बॅरिस्टर होण्यासाठी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवीशिवाय ते बंगालला परतले. ९–नोव्हेंबर–१८८३ रोजी त्यांनी मृणालिनी–देवी(जन्मनाव भावतारिणी १८७३–१९००) यांच्याशी विवाह केला. या विवाहापासून त्यांना पाच अपत्ये (पैकी दोघांचा बालमृत्यू) झाली.१७ १८९० साली रवींद्रनाथांनी सध्याच्या बांग्लादेशातील सियाल्दा येथील टागोर घराण्याची मालमत्ता सांभाळण्यास सुरुवात केली. त्यांची पत्नी व मुले १८९८ साली येथे त्यांच्या सोबत आली. या काळात ते जमीनदार बाबू या नावाने ओळखले जात होते.१८ हा काळ रवींद्रनाथांचा साधना काळ म्हणून ओळखला जातो. त्यांनी नंतर गल्पगुच्छ (मराठी अर्थ: कथा–गुच्छ) नावाचा ८४ कथा असलेले तीन खंडी पुस्तक प्रकाशित केले. आवेग व विरोधाभासयुक्त असे ग्रामीण बंगालचे सुरेख चित्र यात रवींद्रनाथांनी रेखाटले आहे.

१९०१ साली रवीन्द्रनाथ सियाल्दा सोडून शांतिनिकेतन येथे राहण्यास आले. एका आश्रमाची स्थापना करणे हा त्यांचा उद्देश होता . या आश्रमात त्यांनी एका प्रार्थना–गृहाची, प्रयोग–शील शाळेची, बागबगिचा व ग्रंथालयाची स्थापना केली. रवीन्द्रनाथांच्या पत्नीचा व दोन मुलांचा मृत्यू येथेच झाला. वडिलांचे देहावसान १९–जाने–१९०५ला घडले व वारसदार म्हणून रवींद्रनाथांन नियमित मासिक उत्पन्न मिळू लागले. याशिवाय त्यांना त्रिपुराच्या महाराजांकडून आर्थिक साहाय्य, कौटुंबिक दागदागिने व पुरी,ओडिशा येथील बंगला विकून काही प्राप्ती झाली.२१ या काळात त्यांचे साहित्य बंगाली व विदेशी वाचकांचे अधिकाधिक लक्ष खेचू लागले होते. नैवेद्य (१९०१) व खेया (१९०६) या रचना या काळात प्रकाशित झाल्या. याशिवाय कवितांचा षीशश र्िशीश या नावाने अनुवाद करणेही सुरू होते. १४–नोव्हे.–१९१३ रोजी स्वीडिश अकादमीचा नोबेल पुरस्कार प्राप्त झाल्याची बातमी रवीन्द्रनाथांना समजली. गीतांजली या रचनेबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला होता. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते.२२ १९१५ साली त्यांना ब्रिटिश सरकारने सर ही पदवी दिली. १९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली.

१९२१ साली रवीन्द्रनाथ व कृषी–अर्थतज्ज्ञ लिओनार्ड के एल्महिर्स्ट् यांनी शांतिनिकेतन जवळील सुरूल येथे एका ग्रामीण पुनर्निर्माण संस्थेची स्थापना केली. याच संस्थेचे रवीन्द्रनाथांनी पुढे श्री–निकेतन असे नामकरण केले. श्री–निकेतनच्या माध्यमातून महात्मा गांधींच्या प्रतिकात्मक स्वराज्य चळवळीला पर्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता.२३ ज्ञानसंवर्धनातून अज्ञानी व असहाय्य ग्रामीण भागाची सुटका होईल या उदेशाने त्यांनी विविध देशातील विद्वान, दाते व अधिकाऱ्यांस

**विशेष लेख...**

या उपक्रमात सहभागी करून घेतले.२४२५ १९३० सालापासून त्यांनी भारतातील पराकोटीच्या जातीयतेविरुद्ध प्रचार सुरू केला. नाट्य–कविता यांद्वारे जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. केरळच्या गुरुवायुर मंदिरात दलितांना प्रवेश देण्यासाठी त्यांनी आवाहन केले.

जीवनाच्या शेवटच्या दशकात रवींद्रनाथ पूर्णपणे जनसन्मुख होते. त्यांची लोकप्रियता विशेषतः बंगालमध्ये शिखरावर होती. १५–जानेवारी–१९३४ रोजी बिहारमध्ये झालेल्या भूकंपाची, महात्मा गांधींनी दलित अत्याचाराचा परमेश्वराने घेतला सूड अशी संभावना केली. या वक्तव्याचा रवींद्रनाथांनी निषेध केला. बंगालच्या आर्थिक व सामाजिक अवनतीबाबत व कोलकत्यातील भयावह दारिद्र्यबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. या दारिद्र्यावर केलेल्या मुक्तछंदातील १०० ओळींच्या कवितेचा प्रभाव सत्यजित रे यांच्या अपुर संसार ( अपूचे जग) या चित्रपटावरही पडलेला दिसतो.२८२९ पुनश्च (१९३२), शेष सप्तक (१९३५), पत्रपुत (१९३६) आदी गद्यपद्यांचा समावेश असलेले स्वतःच्या लिखाणाचे १५ खंड संपादित केले. याशिवाय 'चित्रांगदा', श्यामा (१९३९), चंडालिका (१९३८) सारख्या नृत्य–नाटिकांवर विविध प्रयोग केले.३० याशिवाय दुई बोन (दोन बहिणी) (१९३३), मलंच (१९३४), रपव चार अध्याय (१९३४)आदी कादंबऱ्या लिहिल्या. अखेरच्या काळात विज्ञानात रवींद्रनाथांनी विशेष रस घेतला. यातूनच त्यांच्या विश्वपरिचय या निबंधसंग्रहाची निर्मिती झाली. जीवशास्त्र, भौतिकी व खगोलशास्त्राचा त्यांनी केलेल्या अभ्यासाचा प्रभाव त्यांच्या कवितेवरही जाणवतो. त्यांच्या कवितेतून झळकणारा निसर्गवाद हा त्यांना वैज्ञानिक नियमांप्रती त्यांना असलेला आदर अधिरेखित करतो. विज्ञानाची प्रगती त्यांनी आपल्या विविध रचनांमधून मांडली आहे जसे से (तो) (१९३७),तीन संगी (१९४०), गल्पस्वल्प (१९४१).

इ.स. १९२४ चिनी विद्वानांसमवेत त्सिंग्व्हा विद्यापीठात टागोर (मध्यात).

रवींद्रनाथांच्या आयुष्यातील शेवटची चार वर्षे प्रदीर्घ व्याधी व आजारपणांनी व्यापली. १९३७ साली शुद्ध हरपून ते बराच काळ कोमात होते. पुन्हा १९४० सालचा कोमा जीवघेणा ठरला. या शेवटच्या काळात लिहिलेल्या काव्यरचना रवींद्रनाथांच्या काव्यरचनांत सर्वश्रेष्ठ मानण्यात येतात. त्यांचे मृत्युविषयक चिंतन या रचनांतून प्रकटते. ७–ऑगस्ट–१९४१ रोजी रवींद्रनाथांचा कोलकात्याच्या त्यांच्या वडिलोपार्जित जोरशंका ठाकूर बाडी येथे मृत्यु झाला.

रवींद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत.

कारवार येथील सृष्टिसौन्दर्यामुळे रवींद्रनाथांना आपल्या पहिल्या नाटकाची प्रेरणा मिळाली ३५ छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्य ही त्यांनी रचले आहे. रवींद्रनाथांचा नेता व क्रांतिकारक या रूपांत भारतीय स्वातंत्र्य संग्रामात थेट सहभाग नव्हता म्हणून व त्यांच्या संस्कृतीपिपासू वृत्तीमुळे त्यांच्यावर महाराष्टात टीका झाली होती. रवीन्द्रनाथांच्या व्यक्तिमत्त्वाने काही महाराष्ट्रीयही प्रभावित झाले होते. रविंद्रनाथ मूळ बंगालीतून वाचण्याच्या इच्छेने पु.ल.देशपांडे हे बंगाली भाषा शिकले. मराठी व कानडी भाषेत लेखन केलेले व कानडी भाषेतील आधुनिक साहित्यातील सर्वश्रेष्ठ कवी व जन्माने महाराष्ट्रीय असलेल्या द.रा. बेन्द्रे यांच्या साहित्यावरही रवींद्रनाथांचा प्रभाव आहे.

गीतांजलीचे इंग्रजी भाषांतर रवींद्रनाथांनीच केले होते. याशिवाय तिचे जगातील अनेक भाषांत अनुवाद झाले. मराठीतले पहिला गद्य अनुवाद हरि नारायण फडके यांनी केला होता. अमरावतीचे डॉक्टर राम म्हैसाळकर (जन्म : २९ मे, १९२९) यांनी रवींद्रनाथांच्या गीतंजलीसकट एकूण चार पुस्तकांचा 'रवींद्र गीतांजली...' नावाचा गद्यानुवाद केला आहे. ह्या अनुवादल मसापचे उत्कृष्ट भावानुवादाचे स.ह. मोडक पारितोषिक मिळाले होते.

पारंपारिक हैदा कोरीवकाम शैलीतील बंगाली लिपीतील रवींद्रनाथांची आद्याक्षरे रवींद्रनाथ स्वतःची हस्तलिखिते अनेकदा अशा कलेने सजवत असत. संगीत,साहित्य, तत्त्वज्ञान, चित्रकला ,नृत्य,शिक्षण अशा बहुविध क्षेत्रात रवींद्रनाथांनी संचार केला. संख्या व दर्जा या दोन्ही कसोट्यांवर रवींद्रनाथांची निर्मिती खरी उतरते.

रवींद्रनाथाच्या बहुमुखी निर्मितीत कविता जरी प्रमुख असली तरी त्यांनी कादंबऱ्या, निबंध, लघुकथा, प्रवासवर्णने, नाटके अशा बहुविध साहित्याची निर्मिती केली. यमकप्रचुरता, आशावाद व गेयता ही त्यांच्या कृतींची प्रमुख वैशिष्ट्ये. कवितेनंतर रवींद्रनाथांची लघुकथा ही प्रमुख रचना मानली जाते. रवींद्रनाथ हे बंगाली भाषेतील आद्य लघुकथाकार समजले जातात. सामान्य माणसांचे जीवन हे त्यांच्या कथांचे बीज आहे.

१५–१६ व्या शतकातील वैष्णव रचनांचा रवींद्रनाथांवर प्रभाव होता. भारतीय परंपरेतील 'ऋषी' संकल्पनेचाही रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव दिसून येतो. गावोगावी गीत गात फिरणाऱ्या फकिरांसारख्या 'बाऊल' कलाकारांची ग्रामीण बंगालमध्ये परंपरा आहे. बाऊल स्वतःस कोणत्याही एका धर्माचे मानत नाहीत. त्यांच्या गीतांत हिंदू, मुस्लिम अशा दोन्ही धर्मांची शिकवण दिसून येते. रवींद्रनाथांनी या परंपरेस बुद्धिजीवी वर्तुळात पूर्वी नसलेली प्रतिष्ठा दिली. त्यांच्या बाऊल परंपरेच्या अभ्यासाने त्यांच्या स्वतःच्या काव्यकृतीस नवा आयाम मिळाला.३६३७ 'मनेर मानुष' (मनातील माणूस) आणि 'जीवन देवता' ही दोन रूपके टागोरांच्या कवितेत बऱ्याचदा दिसतात.

रवींद्रनाथांनी 'चतुरंग', 'शेषेर कबिता' (शेवटच्या कविता), 'चार अध्याय', 'नौका डुबी', 'घरे बाईरे' या सारख्या ४ लघुकादंबऱ्या व ८ मोठ्या कादंबऱ्या लिहिल्या. 'चतुरंग' ही सचिश नावाच्या परस्परविरोधी संकल्पनांत अडकलेल्या पात्राची कहाणी आहे. धार्मिक गूढतेतून आयुष्याचा अर्थ शोधणाऱ्या कथानायकाचा अंती होणारा भ्रमनिरास टागोरांनी या कादंबरीतून मांडला आहे.

गोरा कांदबरीतील मुख्य पात्र पारंपरिक हिंदू सनातनी मताचे समर्थक आहे. ह्या गौरवर्णीय पात्र व इतर पात्रातील संवादातून ही कांदबरी उलगडत जाते. सनातनी गोराच्या विचारामुळे त्याचे सनातनी वडील प्रभावित होत नाहीत. धर्मांधता ही श्रद्धेमुळे नव्हे तर व्यक्तीच्या उग्र प्रकृतीने बनते असे टागोर या कादंबरीतून सांगतात.

'शेषेर कबिता' (शेवटच्या कविता) ही कवितेने नटलेली कादंबरी. यात 'रवींद्रनाथ ठाकूर' हे स्वतःचेच नाव सांगणाऱ्या 'प्रसिद्ध कवी'वर टागोर त्रयस्थपणे टीका करतात. 'चार अध्याय' ही रवींद्रनाथांची शेवटची कांदबरी. 'राष्ट्रभक्ती' म्हणजे काय?, राष्ट्र कसे बनते?, केवळ घोषणाबाजी, कठोर शिस्त यातून खरे स्वातंत्र्य शक्य आहे काय? अशा प्रश्नांचा धांडोळा ही कादंबरी घेते.

# आ. अमरिशभाई पटेल व आ. काशिराम दादा पावरा यांच्या प्रयत्नाने शिरपूर तालुक्यातील १२,४०६ वन जमीन धारक आदिवासी शेतकरी बांधवांना फार्मर आयडी मंजूर

शिरपूर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार अमरिशभाई पटेल व आमदार काशिराम दादा पावरा यांनी केलेली मागणी मंजूर केली असून शिरपूर तालुक्यातील १२,४०६ आदिवासी शेतकरी बांधवांना फार्मर आयडी मंजूर केले आहेत. यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून महाराष्ट्र राज्यातील सर्वच वन जमीन धारक आदिवासी शेतकरी बांधवांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. यामुळे शिरपूर तालुक्यासह महाराष्ट्र राज्यातील सर्व १ लाख ८५ हजार वन जमीन धारक शेतकरी बांधवांना मुख्यमंत्री देवाभाऊ पावले आहेत, अशी भावना सर्वत्र निर्माण झाली आहे. आदिवासी भागातील वन जमीन धारक शेतकरी बांधवांसाठी घेतलेला अलीकडील निर्णय हा केवळ प्रशासकीय निर्णय नसून सामाजिक न्यायाचा मोठा टप्पा ठरला आहे. अनेक वर्षांपासून वन सातबारा (अनुसूची–जे) धारक असलेल्या हजारो शेतकऱ्यांना महसुली क्षेत्रातील शेतकऱ्यांप्रमाणे शासकीय योजनांचा लाभ मिळत नव्हता. यामुळे ते पीक विमा, अनुदान, कर्ज सवलती अशा महत्त्वाच्या योजनांपासून वंचित राहिले होते. दि. २५ एप्रिल २०२६ रोजी शिरपूर येथे आयोजित कार्यक्रमात माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल व आमदार काशिराम दादा पावरा यांनी ही समस्या थेट मुख्यमंत्र्यांसमोर मांडली. त्यांनी स्पष्ट केले की, सुमारे १२,४०६ आदिवासी शेतकरी फार्मर आयडी (शेतकरी ओळखपत्र) नसल्यामुळे योजनांपासून वंचित आहेत.

या गंभीर मुद्द्याची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर सभेतच सर्व मागण्या मंजूर केल्या. विशेष बाब म्हणजे, त्यांनी फक्त घोषणा करून थांबले नाहीत, तर शिरपूर येथून परततात मंत्रालय स्तरावर तात्काळ निर्णय घेऊन या योजनेची अंमलबजावणी सुरू केली. त्यामुळे हा निर्णय केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात उतरला आहे. हा निर्णय त्यांनी महाराष्ट्र शासनाकडून तसेच केंद्र शासनाकडून देखील मंजूर करून घेतला आहे.

या निर्णयामुळे वन जमीन धारक आदिवासी शेतकऱ्यांना खालीलप्रमाणे थेट लाभ मिळणार आहेत. फार्मर आयडी (शेतकरी ओळखपत्र) उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांची अधिकृत नोंदणी पूर्ण होईल. केंद्र सरकारची पी. एम. किसान योजना व राज्य सरकार ची शेतकरी सन्मान योजना, पीक विमा, पीक कर्ज, सोलर योजना, सिंचन विहीर, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना, शेत मजूर स्वतंत्र नोंदणी योजना, सातबारा व कुप नंबर संबंधीत लाभ, नैसर्गिक आपत्ती मदत, कृषी यांत्रिकी योजना (ट्रॅक्टर, नांगर, टिलर, थ्रेशर, ड्रोन व इतर), १०० टक्के मोफत फळबाग योजना, खरीप पीक योजना, रब्बी पीक योजना, आदिवासी खावटी कर्ज योजना, खत बियाणे योजना, विविध शासकीय अनुदान यांसारख्या केंद्र व राज्य सरकारच्या सर्व योजना थेट खात्यात मिळतील. शेतकरी ओळखपत्र मंजुरी मुळे वन विभागाच्या जाचक अटींपासून वन जमीन धारक शेतकरी बांधवांची आता पूर्णपणे मुक्तता झाली आहे.

शिरपूर तालुक्यातील महसुली शेतकऱ्यांसोबत वन जमीन धारक शेतकरी बांधवांसाठी खत व बियाणे मागणी व पुरवठा वाढणार असल्याने शिरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना याचा सर्वतोपरी लाभ मिळणार आहे.

या निर्णयामुळे शिरपूर तालुका आणि परिसरात मोठा सकारात्मक बदल दिसून येत आहे. शेतकऱ्यांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, हा उपक्रम शिरपूर पॅटर्न म्हणून ओळखला जात आहे. तात्काळ निर्णय आणि जलद अंमलबजावणी या गोष्टींमुळे हा पॅटर्न राज्यासाठी आदर्श ठरत आहे. महाराष्ट्र शासनाच्या 'ॲग्रिस्टॅक' उपक्रमांतर्गत सर्व शेतकऱ्यांसाठी आधारलिंक शेतकरी ओळखपत्र (फार्मर आयडी) अनिवार्य करण्यात आले आहे. १५ एप्रिल २०२५ पासून विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी हे ओळखपत्र आवश्यक आहे. यापूर्वी वन सातबारा धारक शेतकरी या प्रक्रियेपासून बाहेर होते, परंतु आता तेही या डिजिटल व्यवस्थेत समाविष्ट झाले आहेत.

या निर्णयामुळे संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील आदिवासी शेतकरी बांधवांमध्ये कृतज्ञतेची भावना व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री कसा असावा? या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या कार्यातून मिळते, असे अनेक शेतकरी सांगत आहेत. शासनाने योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्याने त्यांना न्याय मिळाल्याची भावना निर्माण झाली आहे. हा निर्णय केवळ शिरपूर तालुक्यातील १२,४०६ शेतकऱ्यांपुरता मर्यादित नसून, महाराष्ट्र राज्यातील संपूर्ण आदिवासी विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा सरकारचा उद्देश यामुळे अधिक बळकट झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्यक्षम नेतृत्व, त्वरित निर्णयक्षमता आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी या गुणांमुळे हा निर्णय राज्याच्या प्रशासनासाठी एक आदर्श ठरत आहे.

# शिरपूर पॅटर्न अंतर्गत बंधाऱ्यांतील गाळ काढण्यामुळे भूजल पातळी वाढली;शेतकऱ्यांना मोठा दिलासा

शिरपूर – शिरपूर तालुक्यात जलसंधारणाच्या दृष्टीने राबविण्यात आलेल्या 'शिरपूर पॅटर्न'च्या कामांचा सकारात्मक परिणाम सर्वत्र स्पष्टपणे दिसून येत असून, माजी शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल यांच्या दूरदृष्टीपूर्ण नियोजनामुळे तालुक्यातील भूजल पातळी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे चित्र आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण झाला आहे. शिरपूर तालुक्यातील करवंद गावातील शेतकरी दिनेश सुरेश कोळी यांच्या लौकी शिवारातील शेतावर नुकतेच ट्युबवेल खोदकाम सुरू असताना केवळ ५० ते ६० फुटांवरच पाणी लागल्याची घटना घडली.

सामान्यतः या भागात पाणी मिळवण्यासाठी अधिक खोलीपर्यंत खोदकाम करावे लागते, त्यामुळे एवढ्या कमी खोलीवर पाणी मिळाल्याने शेतकरी कोळी यांना प्रचंड आनंद झाला. ही बाब गावातील इतर शेतकऱ्यांसाठीही आश्चर्यकारक ठरली. ही माहिती मिळताच करवंद गावातील प्रगतीशील शेतकरी तसेच धुळे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष देवेंद्र पाटील यांनी गावातील इतर शेतकऱ्यांसह संबंधित शेतावर भेट देऊन पाहणी केली. प्रत्यक्ष ट्युबवेलमध्ये कमी खोलीवर लागलेले पाणी पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले आणि या यशामागे 'शिरपूर पॅटर्न'ची मोठी भूमिका असल्याचे नमूद केले. यावेळी बोलताना देवेंद्र पाटील व शेतकरी दिनेश कोळी यांनी सांगितले की, दोन ते तीन वर्षांपूर्वी आमदार अमरिशभाई पटेल यांच्या पुढाकारातून अरुणावती नदीवरील करवंद येथील बंधाऱ्यातील गाळ मोठ्या प्रमाणावर काढण्यात आला होता. या उपक्रमामुळे नदीपात्रातील पाण्याची साठवण क्षमता वाढली आणि पाणी जमिनीत मुरण्याची प्रक्रिया अधिक प्रभावी झाली. परिणामी, करवंद व लौकी शिवारातील भूगर्भातील जलसाठा वाढला असून त्याचे प्रत्यक्ष परिणाम आता दिसून येत आहेत. 'शिरपूर पॅटर्न' हा जलसंधारणाचा एक यशस्वी आणि परिणामकारक मॉडेल ठरत असून, या पद्धतीमुळे पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरविण्यावर भर दिला जातो. बंधाऱ्यांतील गाळ काढणे, नदीपात्र खोल करणे आणि पाण्याचा प्रवाह नियंत्रित ठेवणे यामुळे जलसाठा वाढतो व भूजल पुनर्भरणाला चालना मिळते. याच धोरणामुळे आज शेतकऱ्यांना कमी खोलीवर पाणी उपलब्ध होत आहे. या घडामोडींमुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, पाण्याच्या उपलब्धतेमुळे शेती उत्पादन वाढण्याची आशा निर्माण झाली आहे. भविष्यात सिंचनाच्या अडचणी कमी होऊन शेती अधिक समृद्ध होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

शिरपूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार अमरिशभाई पटेल यांनी राबविलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्या कार्याला जलक्रांतीचे शिल्पकार म्हणून ओळख मिळत आहे.

ही किमया आहे शिरपूर पॅटर्नची! ही दूरदृष्टी आहे भाईसाहेबांची! शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवून आणणारा हा उपक्रम आज तालुक्यासाठी वरदान ठरत असून, जलसंधारणाच्या क्षेत्रात शिरपूर तालुका एक आदर्श निर्माण करत असल्याचे चित्र आहे.

# महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण सोहळा उत्साहात संपन्न

धुळे (जिमाका) – धुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध असून विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून विकास कामांना गती देण्यात येत आहे. आजपासून १५ मे पर्यंत स्व–गणनेचे काम सुरू झाले आहे. या जनगणनेत जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने सहभागी व्हावे, असे आवाहन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त येथील पोलीस कवायत मैदानावर आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभात जिल्हावासीयांना शुभेच्छा देताना पालकमंत्री श्री. रावल बोलत होते. यावेळी महापौर मायादेवी परदेशी, आमदार अनुपभैय्या अग्रवाल, आमदार राघवेंद्र पाटील, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, उपविभागीय अधिकारी रोहन कुंवर, उपजिल्हाधिकारी संदीप पाटील, संजय बागडे, कार्यकारी अभियंता रविंद्र पाटील, उपमहापौर ज्योत्सना पाटील यांचेसह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, नागरीक, माध्यम प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. रावल आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणाले की, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत महाराष्ट्र राज्याने प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर राहीला आहे. सन २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडविण्याचा ध्यास देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांनी जोपासला असल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता वाढत आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने काळजी उन्हापासून स्व– संरक्षणाची काळजी घ्यावी. त्यातही वृद्ध आणि बालकांची काळजी घेणे महत्वाचे आहे. घराबाहेर पडताना उन्हापासून संरक्षणाची पुरेशी साधने वापरावीत. भारतीय हवामान विभागाने यंदाच्या पावसाळ्यात संभाव्य एल निनोचा अंदाज व्यक्त केला आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये एल निनोचा सर्वाधिक परिणाम जाणवण्याची शक्यता आहे. पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज आहे पाण्याच्या बचतीसाठी प्रत्येक जिल्ह्यात कृती दल स्थापन करणे, वैरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश दिले आहेत. पाण्याचे सुयोग्य नियोजन, जलसंधारणाच्या कामांना गती आणि जुन्या जलस्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवन यावर भर देण्यात येत आहे. जिल्ह्यातील विविध मध्यम प्रकल्पात ५० टक्के जलसाठा शिल्लक आहे. जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने पाण्याचे महत्व ओळखून पाण्याचा काटकसरीने वापर करावा.

एल–निनोच्या पार्श्वभूमीवर पशुधनाच्या चारा टंचाईवर मात करण्यासाठी येत्या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेतून १०० टक्के अनुदानावर मका व शुगर ग्रेज बियाण्यांचे वाटप करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले. जिल्ह्यात आगामी खरीप हंगामासाठी ३ लाख ७८ हजार हेक्टर क्षेत्रात विविध पिकांच्या पेरणीचे नियोजन आहे. येत्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना बि–बियाणे, रासायनिक खतांची कोणतीही टंचाई जाणवणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना कृषी विभागाला दिल्या आहेत. तसेच जिल्ह्यातील अधिकाधिक खातेदार शेतकऱ्यांनी सुद्धा एआय महाविस्तार प डाऊनलोड करून घ्यावे. खरीप हंगामासाठी राष्ट्रीयकृत, खासगी बँक तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला कर्ज वितरणाचे उद्दिष्ट दिले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेंतर्गत जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना कर्ज मुक्तीचा लाभ मिळणार आहे. याबरोबरच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

प्रादेशिक संतुलित विकासाला चालना मिळावी व सर्व समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीसाठी आकांक्षित जिल्हात धुळे जिल्ह्याचा व तालुक्याचा समावेश झाला आहे. यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. जिल्ह्यात राज्य योजना, जिल्हा वार्षिक योजना व केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून विकासाला गती मिळणार आहे. जिल्ह्यात नवीन उद्योग भवनसाठी १४ कोटी ८० लाख रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकास **(पान ४ वर)**

# धुळे जिल्ह्यात वनक्षेत्र वाढीसाठी प्रभावी उपाययोजना राबवा-पालकमंत्री जयकुमार रावल

धुळे (जिमाका) – जिल्ह्यातील वनक्षेत्र वाढविण्यासाठी वनविभागाने नियोजनबद्ध व प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिले. धुळे वनविभागात पालकमंत्री श्री. रावल यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. यावेळी आमदार अनुपभैय्या अग्रवाल, आमदार राघवेंद्र पाटील, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) निनू सोमराज, उपवनसंरक्षक मोहन नाईकवाडे, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, उपविभागीय अधिकारी रोहन कुवर यांच्यासह वनविभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी तसेच पर्जन्यमानात वाढ होण्यासाठी वृक्षलागवड व वनसंवर्धन अत्यावश्यक आहे. यासाठी शासकीय जमिनीवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करावी. त्यासाठी स्थानिक हवामानाला पूरक प्रजातींची निवड करावी. केवळ वृक्षलागवड न करता त्यांच्या संगोपनासाठी दीर्घकालीन कृती आराखडा तयार करावा. वनसंवर्धनासोबत वन्यजीव वाढीसाठीही प्रयत्न करावेत. वनक्षेत्रात वनतळे तयार करून प्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करावी, असे त्यांनी सांगितले. तसेच शिंदखेडा येथे नवीन नर्सरी उभारावी आणि मोर, ससे, कोल्हे यांसारख्या वन्यप्राण्यांची संख्या वाढविण्यासाठी उपाययोजना कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले. वृक्षलागवड उपक्रमात जनसहभाग वाढविण्यावर भर देत त्यांनी शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था व सामाजिक संघटनांच्या माध्यमातून जनजागृती मोहिमा राबवण्याचे निर्देश दिले. या संस्थांना



वृक्षलागवडीचे 'पालकत्व' देऊन लागवड केलेल्या झाडांचे संगोपन व संरक्षण यावर विशेष भर द्यावा. वृक्षलागवड करताना मोठ्या आकाराची रोपे लावावीत. तसेच 'इको डेव्हलपमेंट प्लॅन' तयार करावा. धुळे शहरात 'ऑक्सिजन पार्क' उभारण्याबाबतही त्यांनी सूचना दिल्या. 'हरित धुळे' उपक्रम अधिक प्रभावी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे त्यांनी सांगितले. यावेळी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) श्रीमती सोमराज व उपवनसंरक्षक श्री. नाईकवाडे यांनी वनविभागाच्या विविध योजनांची माहिती सादर केली.

# धुळे जिल्ह्यात स्व-जनगणनेला सुरुवात; नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा

# पालकमंत्र्यांनी स्वत: स्व-गणना करून केली सुरुवात

धुळे (जिमाका) – केंद्र सरकारतर्फे राबविण्यात येत असलेल्या १६ व्या जनगणनेच्या अनुषंगाने धुळे जिल्ह्यात आजपासून स्व-जनगणना (Self Enumeration) प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. या राष्ट्रीय महत्त्वाच्या उपक्रमात प्रत्येक नागरिकाने सहभागी व्हावे, असे आवाहन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज जनगणनेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पालकमंत्री श्री. रावल यांनी स्वतः स्व-गणना करून या प्रक्रियेची सुरुवात केली. यावेळी आमदार अनुपभैय्या अग्रवाल, आमदार राघवेंद्र पाटील, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस, पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, उपविभागीय अधिकारी रोहन कुंवर, उपजिल्हाधिकारी संदीप पाटील, संजय बागडे आदी उपस्थित होते.

जनगणना ही देशातील सर्वात मोठी प्रशासकीय आणि सांख्यिकीय प्रक्रिया असून, या आकडेवारीच्या आधारे केंद्र व राज्य सरकारांना विविध विकास योजना तयार करणे व पायाभूत सुविधांचे नियोजन करणे शक्य होते. या जनगणनेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच डिजिटल माध्यमाचा वापर करून माहिती संकलित केली जाणार आहे. या प्रक्रियेतील पहिला टप्पा म्हणजे घरगणना (House Listing) होय. नागरिकांच्या सोयीसाठी व सुरक्षिततेसाठी शासनाने स्व-गणना (Self Enumeration) ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. स्व-गणनेचा कालावधी १५ मे २०२६ पर्यंत राहणार आहे. नागरिक https://se.census.gov.in या संकेतस्थळावर जाऊन स्वतःच्या कुटुंबाची माहिती भरू शकतात. हे पोर्टल मराठी, हिंदी, इंग्रजीसह १३ प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध आहे. जे नागरिक काही कारणास्तव स्व-गणना करू शकणार नाहीत, त्यांच्यासाठी १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान प्रगणक व पर्यवेक्षक प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती संकलित करतील. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण तालुका स्तरावर सुरू करण्यात आले आहे.



जनगणना हा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम असल्याने प्रत्येक नागरिकाने स्वतःसह आपल्या कुटुंबाची माहिती १५ मे २०२६ पर्यंत प्राधान्याने नोंदवावी. तसेच स्व-गणना न करणाऱ्या नागरिकांनी प्रगणकांना अचूक माहिती देऊन या राष्ट्रीय उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन पालकमंत्री श्री. रावल यांनी केले.

# इ.१२ वी एच.एस.सी. बोर्ड परीक्षेत हस्ती ज्यु. कॉलेज ची उन्नती पाटील ८५.८३% गुणांसह शिंदखेडा तालुक्यात द्वितीय

*हस्तीची १००% गुणवत्तायुक्त निकालाची परंपरा १२ व्या वर्षीही कायम !*

दोंडाईचा – हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित, हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज, दोंडाईचा या कनिष्ठ महाविद्यालयाचा इ. १२ वी. विज्ञान शाखेचा सतत १२ व्या वर्षीही १०० टक्के गुणवत्तायुक्त निकाल लागला. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षी हस्ती ज्यु. कॉलेजचे एकूण १६ विद्यार्थी एच.एस.सी. बोर्ड परीक्षेत प्रविष्ट झाले होते. यांपैकी ४ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह; तर ५ विद्यार्थी हे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. यात उन्नती पाटील ८५.८३%, गुण मिळवून तालुक्यात द्वितीय व ज्यू. कॉलेज मध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. प्रेक्षा जैन ८५.५०%,समीक्षा पाटील ८२%, देवश्री भावसार ८०.५०%, मेहुल जैन ७९%,तन्वी चोळके ७८.८३%, दिव्या शर्मा ७८.३३%, कृष्णा जमादार ७७.१७%,लक्ष माखिजा ७६.८३% गुण मिळविले.

विशेषतः या वर्षीच्या निकालाचे वैशिष्ट्य म्हणजे २ विद्यार्थ्यांना ८५% पेक्षा अधिक गुण, २ विद्यार्थ्यांना ८०% पेक्षा अधिक गुण तर तब्बल ५ विद्यार्थ्यांना ७५% पेक्षा अधिक गुण प्राप्त झाले. विशेषतः समीक्षा पाटील या विद्यार्थिनीने आयटी विषयात १०० पैकी ९८ गुण; तर उन्नती पाटील या विद्यार्थिनीने भूगोलात १०० पैकी ९६ गुण मिळवले. सोबतच प्रेक्षा जैन या विद्यार्थिनीने रसायनशास्त्र व जीवशास्त्रात १०० पैकी ९३ गुण मिळाले.

हस्ती कनिष्ठ महाविद्यालयाच्या या घवघवीत यशाचे मुख्य कारण म्हणजे शिक्षकांची मेहनत, भरपूर सराव परीक्षा सोबतच पालक वर्गाचा सकारात्मक दृष्टिकोन यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला म्हणून विद्यार्थ्यांनी असे यश संपादन केले. वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना हस्ती ज्यु. कॉलेज शिक्षक रविंद्र टाटीया, हरीश सैंदाणे, धनराज शिरसाठ, गौतमी गिरासे, स्वप्नील माळी, प्रकाश खंडेराय, समन्वयक मनोज ठाकूर, मंगलसिंग राजपूत यांचे मार्गदर्शन लाभले. वरील सर्व यशस्वीतांचे हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष अशोक जैन, कार्याध्यक्ष किशोर जैन, सचिव प्रकाशजी कुचेरिया, माधवजी बोधवाणी, शालेय समिती चेअरमन कैलास जैन तसेच प्र. प्राचार्या रझिया दाऊदी आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे पालक वर्ग यांनी कौतुक केले.

(पान १ वरून) **नगांवबारी...**

उपमहापौर ज्योत्स्ना प्रफुल्ल पाटील, ज्येष्ठ नगरसेवक सुभाष जगताप, नगरसेविका उज्वला भोसले, योगिता कुटे, ललित माळी, महादेव भैय्या परदेशी, आचार्य महंत श्री साळकर बाबा, मंडळ अध्यक्ष प्रथमेश गांधी, सुनिल कपिल, अमोल मराठे, अमोल सूर्यवंशी, मुन्ना वाडिले, रणजीत भोसले, सुरेखा ठाकरे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते

(पान ३ वरून) **महाराष्ट्र राज्य स्थापना...**

मंजुरी मिळाली आहे. जिल्हास्तरीय मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता व धर्मादाय रुग्णालय कक्षामार्फत गंभीर आजारांच्या ६८ रुग्णांना उपचारासाठी ५२ लाख रुपयांची मदत करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात मतदार यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) सुरू झाले असून मतदारांनी आपल्याकडे येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना आवश्यक ती माहिती देण्यासाठी सहकार्य करावे, असेही आवाहन पालकमंत्री श्री. रावल यांनी यावेळी केले. जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून विकासाची अनेक कामे साध्य केली जात आहेत. सर्वसाधारण योजना, आदिवासी उपयोजना आणि अनुसूचित जाती उपयोजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात पायाभूत सोयीसुविधा, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, दळण- वळणाच्या सुविधांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळत आहे. शासनाच्या वतीने आजपासून १५ मे पर्यंत स्व- गणनेचे काम सुरू झाले आहे. या जनगणनेत जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने सहभागी व्हावे. जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या आणि एआय आधारित ई सुविधा पोर्टलचे मागील आठवड्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण झाले. या पोर्टलमुळे नागरिकांना सेवा गतिमान पद्धतीने मिळतील. याबद्दल जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांचे त्यांनी अभिनंदन केले. धुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे. आगामी काळात जिल्ह्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण असलेली सुलवाडे- जामफळ- कनोली उपसा सिंचन योजना, बोरविहीर- नरडाणा रेल्वे मार्ग, औद्योगिक विकासासाठी प्रयत्नशील राहील. त्यामुळे येत्या काळात धुळे जिल्ह्याचा सर्वांगीण विकास झालेला पाहावयास मिळेल, असेही पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले.

**हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय - घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे - ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर - भ्रमणध्वनी - ९४२२७९८०९३ / ९०८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार - ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)**
**(या वृत्तपत्रातील लिखाणाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)**